

# Sanskruti International Multidisciplinary Research Journal

IFSIJ IMPACT FACTOR : 2.125

URL:ww.simrj.org.in Journal UOI:1.01/simrj

Volume III Issue I Jul-Aug-Sep 2017











Editor-in-Chief
SANTOSH BONGALE

Scanned with OKEN Scanner

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
*Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj*

# महाराष्ट्रातील आदिवासींच्या शैक्षणिक समस्या

श्री. संतोष बोंगाळे

संशोधक विध्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

ईमेल : mr_bongale@rediffmail.com

***सारांश :***

*आदिवासी शिक्षणाच्या बाबतीत महिलांचे प्रमाण खूपच कमी आहे महिलांचे शैक्षणिक प्रमाण अवघे २ टक्केच असल्याचे दिसते. सुशिक्षित आदिवासीचे रोजगाराचे प्रश्न तीव्र स्वरूपाचे निर्माण झाले आहेत. मूळ आदिवासींना फायदा होण्यापेक्षा त्यातील नेत्यांनाच वा बलाढ्य लोकांनाच होत असल्याचे समोर आले आहे. जेथे आदिवासी विकास होत आहे तेथे आदिवासी संस्कृती नष्ट होत आहे. आदिवासीचा सांस्कृतिक विकास व आर्थिक विकास करून त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली पाहिजे. आदिवासींना समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा समस्यांचा निपटारा केला पाहिजे. इतर समाजाकडून होणारे शोषण थांबले पाहिजे. आदिवासींना सर्वांगीण विकासाचे शिक्षण दिले गेल्यास त्यांच्यातील आरोग्य, कुपोषण, धर्मांधता, व्यसनाधीनता, अनिष्ठ प्रथा अंधश्रःदा या समस्या देखील सुटण्यास मदत होईल.*

***कळ शब्द : आदिवासी शिक्षण, समस्या, शैक्षणिक योजना, आदिवासी जमाती***

**प्रास्ताविक:**

जगातील अनेक देशात वेगवेगळ्या आदिवासींच्या जमाती अस्तित्वात असल्याचे दिसते. विशेषकरून आशिया, आफ्रिका, आणि अमेरिका या खंडामध्ये आदिवाशी जमातींचे प्रमाण सर्वाधिक आहे. भारत देशातही अनेक आदिवाशी जमाती आहेत. त्यांची संख्या जवळ जवळ ४१५ च्या आसपास आहे. महाराष्ट्रामध्ये गोंडवाना, सह्याद्री आणि सातपुडा या तीन प्रदेशात भिल्ल, कोरकू, गौंड, कोळी, परधान, कोलाम, बंजारा, कातकरी, ठाकूर, राजगोंड, कवर, पावरा, गावित अशा जवळ जवळ ४७ आदिवाशी जमातींचे वास्तव्य खूप मोठ्या प्रमाणात आहे

आदिवासी म्हणजे अगदीमुळचे रहिवासी. आदिवासी लोक प्रामुख्याने अरण्यामध्ये किवा डोंगरांच्या दऱ्या खोऱ्यात राहतात. आदिवासी समाज प्रस्थापित समाजाकडून अनेक कारणांनी छळला गेला असून त्यांच्या वाट्याला लाचारी व भटकंती आली आहे.



Scanned with OKEN Scanner

### आदिवासी व्याख्या

मानववंशशास्त्र शब्दकोशामध्ये ई. बी. टायलर यांनी अशी व्याख्या केली आहे. 'एका सामाजिक भूप्रदेशात राहणारा व एक बोली भाषा, सांस्कृतिक एकजिनसीपणा आणि एकात्मिक सामाजिक संगठन असलेला सामाजिक गटम्हणजे आदिवासी जमात होय'. तर गिलीन यांनी 'एका विशिष्ठ भूप्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या स्थानीय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात'. अशी व्याख्या केली आहे.

आदिवासी समाज जीवन हे पारंपारिक असून आजच्या प्रगत समाज जीवनापासून ते खूपच दूर आहे. त्यामुळे आदिवासी समाजजीवनात सामाजिक, आर्थिक, राजकीय, आरोग्य, शैक्षणिक अनेक प्रकारच्या समस्या असल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आदिवासींच्या शैक्षणिक समस्या कोणकोणत्या आहेत याचा उहापोह करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### महाराष्ट्रातील आदिवासींच्या शैक्षणिक समस्या

महाराष्ट्रातील आदिवासींच्या समस्या ह्या त्यांच्या मुल समाज जीवन पद्धतीत असल्याचे दिसते. त्यामध्ये पण येथे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही. त्यांची स्वतः ची अशी एक बोली असून तीच्या मार्फतच संवाद साधला जातो.

शिक्षणामुळे कोणताही समाज प्रगती करून सामाजिक दृष्ट्या तो सुसंस्कारित होण्यास मदतच होते. शिक्षणामुळे समाजजीवन अधिक सुखकर होते. अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आपणाला शिक्षणाची गरज असते.

### आदिवासींसाठी शिक्षण विषयक योजना

१९८२ मध्ये इंडियन एज्युकेशन कमिशन स्थापन करण्यात आले. या कमिशनने आदिवासींच्या शिक्षणासाठी महत्वाच्या शिफारशी केल्या. तेव्हापासून डे स्कूल, बोर्डिंग स्कूल व आश्रमशाळा अशा तीन प्रकारच्या शिक्षणिक संस्था अस्तित्वात आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणावर अधिक भर देण्यात आला . नावे शैक्षणिक पर्व सुरु झाले. पण अजून ही आदिवासींचा शिक्षणिक प्रवाहात अत्यल्प समावेश आहे. आदिवासीच्या शिक्षणासाठी १९२२ मध्ये गुजरात मधील भिल्लाच्या मेराखेडी या गावात पहिली आश्रम शाळा सुरु करण्यात आली .

भारतात निरक्षर तेचे प्रमाण बरेच असून ते ग्रामीण भागात सर्वाधिक आहे. आदिवासींचे साक्षर तेचे प्रमाण नगण्य आहे. आदिवासींचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून शासन स्तरावर अनेक योजना



Scanned with OKEN Scanner

राबवल्या जातात. परंतु आदिवासींची शिक्षणात रूची नसल्याचे दिसते. सन १९८३ मध्ये आदिवासीचा विकास व्हावा म्हणून आदिवासी विकास विभाग स्थापन झाला त्याद्वारे शैक्षणिक योजना व सवलती शिक्षण विभागातर्फे तसेच समाज कल्याण विभागा मार्फत कार्यान्वित केल्या. शैक्षणिक दर्जा वाढवा म्हणून अनेक विशेष उपक्रम राबवण्यात आले.याच बरोबर सुशिक्षित बेरोजगारांना लघुउद्योग प्रशिक्षण व कर्जाचे वाटप कृषी महाविध्यालय, तसेच उच्च शिक्षणासाठी विध्यावेतन व शिष्यवृत्या देण्यात आल्या. याचा लाभ अनेकाना मात्र झाला नाही. याचे कारण म्हणजे मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार हे होय. या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत ना पोहचता भलत्याच व्यक्तींना होतो हे वास्तव नाकारून चालणार नाही.

**शैक्षणिक विकासातील अडथळे वा समस्या**

9 ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन आहे. आदिवासींच्या विकासासाठी आतापर्यंत कोट्यवधी खर्च झाले, अनेक योजना आखल्या, पण खरंच आदिवासींचा विकास झाला का हा प्रश्नच आहे. आदिवासींच्या शैक्षणिक समस्या ह्या अधिकच गंभीर स्वरूपाच्या आहेत हे मान्यच करावे लागेल. आदिवासींचा आधीनिक जगाशी संपर्क हा खूपच अल्पवा तुटक स्वरूपाचा आहे. आदिवासींचा विकास होत नाहीकारण हा समाज परंपरा यांना अधिक चिकटून राहिला आहे. त्यामुळे तो नाविन्यपूर्ण विकासाला साथ न देता शिकार करून उदरनिर्वाह करून स्वतःच्यासंस्कृतीला चिकटून राहणेच पसंत करताना दिसतो. त्यांमुळे उच्च शिक्षणापर्यंत त्यांची मजल जात नाही. मुलापेक्षा मुलीचे प्रमाण तर खूपच कमी आहे. जेवढे विध्यार्थी शाळेत हजर राहायला हवेत त्यापैकी थोडेच हजार असतात. प्राथमिक शाळेतील गैरहजेरीचे प्रमाण खूपच जास्त आहे. त्याची अनेक कारणे आदिवासीच्या समाज जीवनात वा कौटुंबिक जीवनात आहेत. पालकांची आर्थिक परस्थिती हे एक महत्त्वाचे कारण सांगता येईल. जेव्हा शाळा काही कारणास्तव बंद असते (उदा: महत्त्वाचे सण, दिवाळी सुट्टी, उन्हाळी सुट्टी ) तेव्हा सुट्टीनंतर मुलांना शाळेत येण्याची मानसिक तयारीच नसते.

सरकारी सुविधा या कितीतरी उत्कृष्ट असल्या तरी आदिवासीच्या शिक्षणासाठीचे यश म्हणावे तेवढे अजूनही प्राप्त होत नाही. महाराष्ट्रातील आदिवासींच्या मुलांना शासकीय आश्रम शाळेत मोफत शिक्षणाबरोबर जेवण, नाश्ता, राहणे, अभ्यास साहित्य मोफत मिळत असते परंतु आदिवासींचे प्रबोधन ना झाल्याने शैक्षणिक दर्जा उंचावत नाही. गुणवत्ता ही ढासलेली पाहायला मिळते. खरे तर शैक्षणिक संस्थांमध्ये अध्यापनाला महत्वाचे स्थान असून त्यालाच प्राधान्य क्रम दिला पाहिजे परंतु शिक्षकालाच अनेक प्रकारची कामे असल्याने तो अध्यापनाकडे दुर्लक्ष करताना दिसतो .

आदिवासींच्या मुलांचे शैक्षणिक साहित्य हे शहरी भागातील अभ्यासकांकडून तयार होते. त्यामुळे सदर पाठ्यक्रमातील आशय हा आदिवासीसाठी अनभिज्ञ ठरतो. किबहुना मुलांनामध्ये अभ्यासक्रमाविषयी



Scanned with OKEN Scanner

रस वा रुची निर्माण होत नाही. साहजिकच मुले शिक्षणापासून वंचित राहतात. व सरकारचा मुख्य हेतूच बाजूला पडत असल्याचे समोर येते.

आदिवासींची बोली भाषा ही भिन्न भिन्न जमातीमुळे वेगवेगळी असते त्या कारणाने मराठीतून ज्ञान प्राप्त करने त्यांच्यासाठी त्रासदायक ठरते हे नाकारून चालणार नाही. तसेच राष्ट्रभाषा हिंदी व इंग्रजी या भाषांपासून आदिवासींची मुळे दूरच राहतात आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची व पालकांची प्रवेशासाठी शाळांमध्ये भटकंती, वणवण सुरु आहे. बऱ्याच शाळांची प्रवेश क्षमताच कमी असल्याने तसेच वर्ग खोल्या, तुकड्या मर्यादित असल्याने सर्वांना प्रवेश देणे अडचणीचे झाले आहे. परिणामी काही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

अमरावती मेळघाट गडचिरोली या प्रदेशातील कोरकू माडिया तसेच अतिदुर्गम प्रदेशामध्ये शैक्षणिक समस्या या अधिक आहेत हे वास्तव आहे. आदिवासी शाळांमध्ये शिक्षक हे शहरी भागातून केवल नोकरीसाठी व गरजेपोटी जातात बऱ्याचवेळा हे शिकच बिगर आदिवासी असल्याने आदिवासींच्या सामाजिक आर्थिक वगैरे अशा समस्या पासून ते दूर असल्याने अडथळे निर्माण होतात. मुलांची भाषा संस्कृती ही बहुतेक वेळा त्यांना माहित नसते. विध्यार्थी व शिक्षकाचे नाते हे परकेपणाचे वाटते.

आदिवासी हे शहरांपासून खूप दूर राहत असल्याने त्यांच्या पासिसरात शाळा नसणे, शाळेचे अंतर खूप दूर असणे, रस्त्यांची सोय नसणे, वाहनाची उपलब्धता नसणे, आधुनिक तंत्र विज्ञानाला विरोध असणे, मुलांची सुरक्षितता अशा अनेक कारणाने आदिवासी मुलाची शाळेतील गळती वाढते व शाळाबाह्य मुलांचे प्रमाण अधिक होत जाते. आदिवासींच्या शिक्षाणासाठी सरकार ही पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत नाही.

सुरुवातीच्या वर्षामध्ये सूचना देण्याचे माध्यम म्हणून आदिवासी भाषेचा वापर करणे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सोयीचे होईल. परिचयाच्या आणि स्थानिक माध्यमाचा वापर केल्यास बालकांना नव्या संकल्पना सुलभरित्या आणि चटकन आत्मसात होतात, हे बाल विकास आणि अध्यापनशास्त्रातील संशोधनातून सिध्द झाले आहे. शहरात राहणा-या शिक्षकांच्या तुलनेत आदिवासी भागातील शिक्षकांच्या अनुपस्थितीचे प्रमाण खूपच जास्त आहे. शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या परिचित विश्वाशी साधर्म्य दाखवणारा नसतो. परिणामी त्यांच्या गोंधळात भर पडते. त्याचप्रमाणे शिक्षक शाळेत उपस्थित असताना या विद्यार्थ्यांसाठी विशेष अध्यापन पध्दती अवलंबण्याच्या दृष्टीने अनभिज्ञ असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आणि अध्यापनात लवचिकतेचा अभाव राहतो. आदिवासी पालकांच्या मुलाखती घेतल्या असता ते आपल्या मुलांच्या भवितव्याबाबत सजग वाटले आणि त्यांनी मुलांच्या शिक्षणाला पूर्ण पाठिंबा दर्शवला. मात्र त्यांना



Scanned with OKEN Scanner

सुशिक्षित करण्याच्या पयत्नात समाजाचा अधिक व्यापक सहभाग अपेक्षित आहे.आदिवासी समाजामध्ये आदिवासी मुली हा सर्वात दुर्लक्षित घटक असून, त्यांना शिक्षण दिले जाण्याचे पमाणही कमी आहे 7 ते 14 वयोगटातील 26% मुलींच्या तुलनेत खालच्या जाती आणि आदिवासी समाजातल्या 37% मुली शाळेत जात नाहीत. आर्थिक आणि सामाजिक मर्यादांमुळे अनेक आदिवासी जमातीमधील पालक मुलींच्या शिक्षणाला फारसे महत्व देत नाहीत. त्यांना केवळ पारंभिक शिक्षण दिले जाते आणि बाहेरच्या जगापासून सुरक्षित ठेवले जाते. बहुतेकदा या मुली शेतीची कामे करतात, वनातल्या वस्तु जमा करतात आणि भावंडांची काळजी घेतात.

**सारांश**

आदिवासी शिक्षणाच्या बाबतीत महिलांचे पमाण खूपच कमी आहे महिलांचे शैक्षणिक पमाण अवघे २ टक्केच असल्याचे दिसते. सुशिक्षित आदिवासीचे रोजगाराचे प्रश्न तीव्र स्वरूपाचे निर्माण झाले आहेत. मूळ आदिवासींना फायदा होण्यापेक्षा त्यातील नेत्यांनाच वा बलाढ्य लोकांनाच होत असल्याचे समोर आले आहे. जेथे आदिवासी विकास होत आहे तेथे आदिवासी संस्कृती नष्ट होत आहे. आदिवासीचा सांस्कृतिक विकास व आर्थिक विकास करून त्यांना पतिष्ठा पाप्त करून दिली पाहिजे. आदिवासींना समाजजीवनाच्या मुख्य पवाहात आणून त्यांचा समस्यांचा निपटारा केला पाहिजे. इतर समाजाकडून होणारे शोषण थांबले पाहिजे. आदिवासींना सर्वांगीण विकासाचे शिक्षण दिले गेल्यास त्यांच्यातील आरोग्य, कुपोषण, धर्मांधता, व्यसनाधीनता, अनिष्ठ पथा अंधश्रद्धा या समस्या देखील सुटण्यास मदत होईल.

**संदर्भ:**


1. गोविंद गारे, 'आदिवासी विकास योजना', आदिवासी विकास पतिष्ठान, पुणे, १९९८
2. डॉ. शौनक कुलकर्णी, 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन पुणे, २००९
3. डॉ. सौ.शैलजा देवगावकर, डॉ. श.गो. देवगावकर, 'आदिवासी विश्व', आनंद पकाशन, नागपूर,२००१
4. डॉ. शरणकुमार लिंबाळे, 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७